७ वा वर्धापन दिन... विशेषांक

॥ श्री ॥

आपली भूमी... आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे




ब्रह्मचारिणी देवी
या हिंदू धर्मातील नवदुर्गांपैकी दुसरे रूप आहेत.


■ अहिल्यानगर ■ सोमवार, दि. १२ ऑक्टोबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ९८ वा ■ पाने ८ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com



आशिर्वाद



स्व. योगेश भालेराव

॥श्री रेणुकामाता प्रसन्न ॥

नवी क्षितिजे, नवी आशा
शुध्द नीती, अतूटनाती,
दूरदृष्टी अन् अर्थसेवेतून



नवी आव्हाने, नवी दिशा..।
हाच आमुचा पाया..
प्रगतीचे शिखर गाठूया..।

आशिर्वाद



स्व. चंद्रकांत भालेराव

# श्री रेणुकामाता मल्टीस्टेट

## को. ऑप. अर्बन क्रेडिट सोसायटी लि.

मुख्य कार्यालय : रेणुका भवन, सिटी सर्व्हे नं. ३५/२ अ+२ब, सिटी प्राईड हॉटेलजवळ, पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर



संस्थेचा विस्तार
९ राज्यात १४० शाखा

वीरभूमी
वर्धापनदिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

## अत्याधुनिक सुविधा आणि सुरक्षा अभिवचन पूर्ण करण्यासाठी आम्ही वचनबध्द आहोत..!

आजच्या स्पर्धेच्या युगात तेच लोक काम करतात जे स्पर्धा करुन इतरांपेक्षा आपला वेगळा ठसा जनमाणसांवर उमटवतात, आम्हास अभिमानाने सांगावेसे वाटते की, आम्ही त्यापैकी एक बनण्याचा प्रयत्न करीत आहोत. ग्राहक सेवा हेच आमचे ब्रिद वाक्य आहे. त्यामुळेच ग्राहकांसाठी सकाळी ९ ते रात्री ७ वा. अविरत सेवा आम्ही देतो. त्याचप्रमाणे व्यापारी वर्गाचे हित लक्षात घेता. भारतातील प्रमुख शहरावरील डी. डी. सेवा फक्त ५ पैशात उपलब्ध.

संपर्क
टोल फ्री नं. 18002334140
मोबाईल
9225328394, 9225328301, 9225328571
Website www.renukamatamultistate.com
Email callcenter@renukamatamultistate.com

इथं ग्राहकांच्या गरजांना अधिक महत्व दिलं जातं !

- श्री रेणुकामाता मल्टीस्टेटच्या सर्व शाखांमध्ये एटीएम मशीन उपलब्ध करण्यात आले असून या मशीनवर सर्व बँकांचे एटीएम कार्ड चालतात.
- तसेच संस्थेच्या सर्व खातेदारांना एटीएम कार्ड उपलब्ध केले असून हे कार्ड त्यांना कोठेही कोणत्याही बँकेच्या मशीनवर वापरता येणार आहे.
- बीबीपीएस सूविधा : लाईट बिल, रिचार्ज फोन बिल, इन्शुरन्स पेमेंट, कर्जाचे हफ्ते, गॅस बुकिंग, क्रेडिट कार्ड बिल पेमेन्ट, फास्ट टॅग रिचार्ज आदीं सुविधा उपलब्ध




### संस्थेची वैशिष्ट्ये

संस्थेचे कामकाज सकाळी ९ ते रात्री ७ पर्यंत. ठेवींना आकर्षक व्याजदर. विनयशील व तत्पर सेवा, आकर्षक कर्जसेवा उपलब्ध. संपूर्ण संगणकीकृत शाखा. भारतातील प्रमुख शहरांवरील डिमांड ड्राफ्टची सेवा फक्त ५ पैशात सोनेतारण कर्ज १२/३६५ दिवस उपलब्ध. भारतात कोठेही अर्ध्या तासात पैसे वर्ग करण्याची सुविधा, भारतात कोठेही पैसे स्वीकारण्याची सुविधा.

### व्यवसाय वाढीसाठी

- आमच्या पॉज मशिनचा उपयोग करा.
- आमच्या पॉज मशिनद्वारे सर्व बिलांचे रक्कम क्रेडिट कार्ड व डेबिटकार्डद्वारे स्विकारले जातील.
- आमच्या सर्व शाखांमध्ये कोणत्याही बँकेच्या खातेदारास रक्कम काढण्याची सेवा उपलब्ध.



### एफ.डी.आर. दर

- ३१ दिवस ते ६ महिने ८.५ % (द.सा.द.शे.)
- ६ महिने ते १ वर्ष ९.५० % (द.सा.द.शे.)
- १ वर्षापेक्षा जास्त १० % (द.सा.द.शे.)
- दामदुप्पट ठेव ८४ महिने.

NCP शेअर्स १२ महिने ११ टक्के लाभांश

ज्येष्ठ नागरिक, विधवा महिला, माजी सैनिक व अपंग नागरीकांसाठी ०.५०% जास्त व्याजदर




### सुलभ कर्ज योजना

- वैयक्तिक घर
- सोने व वाहन तारण
- तातडीची कर्ज सुविधा

### विशेष सुविधा

- डी मॅट अकाऊंट
- ट्रेडींग अकाऊंट
- म्युच्युअल फंड

### मोफत सुविधा

RTGS व NEFT फोन बील, लाईट बील, रिचार्ज INWARD, RTGS/NEFT पॉज मशिन, क्यु आर कोड, क्रेडिट कार्ड सुविधा

### विमा सुविधा

- हेल्थ इन्शुरन्स
- मोटर इन्शुरन्स
- टर्म लाईफ इन्शुरन्स

# कळसुबाई मातेचे पावित्र्य जपूया; निसर्गाचे संरक्षण करूया

**नवरात्रोत्सवानिमित्त भाविकांना आवाहन; 'माझा गड-माझी जबाबदारी' या भावनेतून गड स्वच्छ, सुंदर व पवित्र ठेवण्याचे आवाहन**



**● अकोले । वीरभूमी-**

महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर असलेल्या कळसुबाई मातेच्या पवित्र गडावर नवरात्रोत्सवानिमित्त महाराष्ट्रासह राज्याबाहेरील हजारो भाविक व पर्यटक दर्शनासाठी येत असतात. नऊ दिवस चालणाऱ्या या पवित्र उत्सवात कळसुबाई मातेचे दर्शन घेताना प्रत्येक भाविकाने देवी मातेचे पावित्र्य, गडाचे धार्मिक महत्त्व आणि निसर्गसौंदर्य जपण्याची जबाबदारी पार पाडावी, असे नम्र आवाहन समाजसेवक अनंत महादू घाणे व कळसुबाई देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तुकाराम सोमा खाडे यांनी केले आहे.

कळसुबाई गडावर दर्शनासाठी येताना भाविकांनी शांतता, शिस्त आणि सहकार्याची भावना ठेवावी. डोंगर चढताना किंवा उतरताना ये-जा करणाऱ्या इतर भाविकांना शक्य ती मदत करावी. वृद्ध, महिला, लहान मुले तसेच अडचणीत सापडलेल्या भाविकांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

गडावर जाताना निसर्गाची कोणत्याही प्रकारे हानी होणार नाही, याची प्रत्येकाने कटाक्षाने काळजी घ्यावी. झाडे, वनस्पती, डोंगर परिसर तसेच नैसर्गिक साधनसंपत्तीचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

विशेषतः भाविकांनी सोबत आणलेल्या प्लास्टिकच्या पिशव्या, पाण्याच्या बाटल्या, खाद्यपदार्थांचे रॅपर व इतर कचरा गडावर कुठेही टाकू नये. उपलब्ध कचराकुंडीचा वापर करून कचरा त्यात जमा करावा. शक्य असल्यास आपण सोबत आणलेला कचरा परत खाली आणून योग्य ठिकाणी त्याची विल्हेवाट लावावी.

'माझा गड-माझी जबाबदारी' या भावनेतून प्रत्येक भाविकाने कळसुबाई गड स्वच्छ, सुंदर आणि पवित्र ठेवण्यासाठी योगदान द्यावे. देवीचे दर्शन घेताना इतर भाविकांच्या श्रद्धेचा आणि धार्मिक भावनांचा आदर करावा.

नवरात्रोत्सव हा केवळ उत्सव नसून श्रद्धा, संस्कृती, निसर्गसंवर्धन आणि सामाजिक एकोपा जपण्याचा पर्वकाळ आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील तसेच महाराष्ट्राबाहेरील सर्व भाविकांनी शांततेत, सुरक्षिततेत आणि पर्यावरणपूरक पद्धतीने कळसुबाई मातेचे दर्शन घ्यावे.

गडावर दर्शनासाठी येताना कोणतीही अडचण किंवा अडथळा निर्माण झाल्यास पोलीस प्रशासन, वन विभाग तसेच स्वयंसेवकांची मदत घ्यावी. संबंधित यंत्रणा भाविकांना आवश्यक ते सहकार्य करतील. दर्शन घेऊन सर्व भाविकांनी सुखरूपपणे आपल्या गावी परतावे, असे आवाहन समाजसेवक अनंत महादू घाणे, देवस्थान विश्वस्त अध्यक्ष तुकाराम खाडे, राजू भारमल, योगेश खाडे, पांडू खाडे, प्रकाश खाडे, चंदर खाडे व नंदू तातळे यांनी केले आहे.

# ज्ञानेश्वर कारखान्याचा सोमवारी बॉयलर अग्नीप्रदीपन व गळीत हंगाम शुभारंभ

**● नेवासा । वीरभूमी -**

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६-२७ या वर्षातील ५३ व्या बॉयलर अग्नीप्रदीपन व गळीत हंगामाचा शुभारंभ सोमवार, दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे. कारखान्याचे अध्यक्ष तथा माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांच्या हस्ते हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती कार्यकारी संचालक



अनिल शेवाळे यांनी दिली.

या कार्यक्रमास जिल्हा सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष तथा माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, संत ज्ञानेश्वर संस्थानचे अध्यक्ष तथा माजी आमदार पांडुरंग अभंग, ॲड. देसाई देशमुख, कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील तसेच सर्व संचालक मंडळ प्रमुख उपस्थित राहणार आहे.

ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या ५३ व्या गळीत हंगामाच्या शुभारंभ कार्यक्रमास कारखान्याचे सभासद, कामगार, हितचिंतक आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यकारी संचालक अनिल शेवाळे व सरव्यवस्थापक रविंद्र मोटे यांनी केले आहे.































# SPOT NEWS

## श्रीगोंदा सहाय्यक कृषी अधिकारी संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी प्रभू देवकाते बिनविरोध

**● श्रीगोंदा । वीरभूमी-**



कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न, पदोन्नती आणि न्याय्य हक्कांसाठी प्रभावी पाठपुरावा करण्यासह शेतकऱ्यांना दर्जेदार सेवा देण्याचा निर्धार व्यक्त करत प्रभू गोरख देवकाते यांची महाराष्ट्र राज्य सहाय्यक कृषी अधिकारी संघटनेच्या श्रीगोंदा तालुकाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. शनिवार दि. १० रोजी झालेल्या त्रैवार्षिक निवडणुकीत नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. नूतन कार्यकारिणीत जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी प्रतीक प्रल्हाद कांबळे, कार्याध्यक्षपदी कृष्णा रामदास अरकस, बिलवंडी मंडळ उपाध्यक्षपदी केशव बापू अनारासे, श्रीगोंदा उपाध्यक्षपदी राजेंद्र हरिभाऊ राहिंज, तर कोळगाव उपाध्यक्षपदी जुबेर कलिंदर शेख यांची निवड झाली. तालुका सचिवपदी अनिल खंडेराव दळवी, खजिनदारपदी जालिंदर दशरथ माळशिकारे, प्रसिद्धीप्रमुखपदी विशाल अरुण सूर्यवंशी आणि महिला तालुका सदस्यपदी भारती बन्सी शिंदे यांची निवड करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून विजय साबळे, तर सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून अमोल भालेराव यांनी काम पाहिले. कर्मचाऱ्यांचे प्रलंबित सेवाविषयक प्रश्न मार्गी लावणे, पदोन्नतीच्या प्रश्नांवर पाठपुरावा करणे आणि संघटनेची एकजूट मजबूत करणे, याला नूतन कार्यकारिणी प्राधान्य देणार आहे. त्याचबरोबर कृषी योजनांची प्रभावी अंमलबजावणी, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार आणि शेतकऱ्यांपर्यंत शासकीय योजनांचे लाभ पोहोचविण्यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये समन्वय वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे. निवडीनंतर नूतन तालुकाध्यक्ष प्रभू देवकाते म्हणाले, कर्मचाऱ्यांचे प्रश्न सक्षमपणे मांडून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने पाठपुरावा करू. सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन संघटनेला अधिक सक्षम करण्यासह शेतकऱ्यांना प्रभावी सेवा देण्यासाठी कटिबद्ध राहू. कर्मचारीहित आणि शेतकरीहित यांचा समन्वय साधत संघटनेचे काम अधिक गतिमान होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## बोल्हेगावात भरदिवसा घरात घुसून धाडसी चोरी

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

बोल्हेगाव येथील भोर मळा परिसरातील एका कॉलनीत भरदिवसा एका महिलेच्या घरात घुसून धाडसी चोरी झाल्याची घटना ९ ऑक्टोबर रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास घडली. सुनीता तुपेरे असे या पीडित महिलेचे नाव असून दोन चोरट्यांनी घरात घुसून त्यांना मारहाण केली आणि सोन्याचे दागिने व रोकड लुटून नेली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. पीडित महिलेने दिलेल्या माहितीनुसार, त्या घरात झोपलेल्या असताना दोन अज्ञात व्यक्तींनी घरात प्रवेश केला. महिलेचा गळा दाबून कानातील व गळ्यातील दागिने हिसकावून घेतले. या घटनेत चोरट्यांनी पाच ते सात तोळे सोन्याचे दागिने, १६ हजार रुपयांची रोकड आणि चार्जिंगला लावलेले दोन मोबाईल चोरून नेले आहेत.

# अमरापूरच्या रेणुका माता देवस्थानात घटस्थापनेने नवरात्रोत्सवाचा प्रारंभ

**माहूरगडाहून आणलेल्या पायी ज्योतीचे जल्लोषात स्वागत । नऊ दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन**

**● शेवगाव । वीरभूमी -**

साडेतीन शक्तिपीठांपैकी माहूरगड निवासीनी श्री रेणुका मातेचे प्रतिरूप म्हणून लौकिक प्राप्त केलेल्या आणि राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र अमरापूर येथील श्री रेणुका माता देवस्थानात विधिवत घटस्थापना करून शारदीय नवरात्रोत्सवास मोठ्या उत्साहात प्रारंभ करण्यात आला.

घटस्थापनेनिमित्त श्री रेणुका परिवारातील ३० भाविकांनी श्रीक्षेत्र माहूरगडाहून पायी ज्योत आणली. तालुक्यात आगमन होताच ठिकठिकाणी या ज्योतीचे स्वागत करण्यात आले. अमरापूरपासून देवस्थानापर्यंत बँड पथकाच्या गजरात जल्लोषपूर्ण मिरवणूक काढण्यात आली.

ज्योत देवस्थानात दाखल झाल्यानंतर श्री रेणुका भक्तानुरागी डॉ. प्रशांत नाना भालेराव, पाथर्डीचे प्रथम नगराध्यक्ष सुभाष घोडके, माजी नगराध्यक्षा व लोकनियुक्त पहिल्या महिला नगराध्यक्षा जनाबाई घोडके, शिवसेना नेते अरुण मुंढे आणि शेवगाव नगर परिषदेच्या नगराध्यक्षा माया मुंढे या मान्यवरांच्या हस्ते पायी ज्योत आणणाऱ्या भाविकांची पाद्यपूजा करण्यात आली. त्यानंतर सर्व भाविकांना महावस्त्रे देऊन सन्मानित करण्यात आले.

रविवारी सकाळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व श्री रेणुका भक्तानुरागी डॉ. प्रशांत नाना भालेराव, वेदशास्त्रसंपन्न सच्चिदानंद देवा देशपांडे, तुषार देवा आणि देवस्थानच्या ब्रह्मवृंदांच्या उपस्थितीत आईसाहेबांचे पुण्याहवाचन, मातृकापूजन व महारुद्राभिषेक करण्यात आला. सुवर्णालंकारांनी देवीला अलंकृत करून विधिवत घटस्थापना करण्यात आली. त्यानंतर आईसाहेबांना पायसाचा नैवेद्य दाखवून महाआरती करण्यात आली. याचवेळी शतचंडी यागास प्रारंभ करण्यात आला.

नवरात्रोत्सवात दररोज सकाळी ११.३० वाजता महाआरती, सायंकाळी ४ वाजता संगीतराजोपचार, सायंकाळी ६.३० वाजता सायंआरती, रात्री ७ वाजता श्रींची स्तुतिवचने व अष्टके आणि रात्री ८ वाजता श्रींची छबिना मिरवणूक असे नियमित कार्यक्रम होणार आहेत.

रविवार, दि. ११ रोजी श्रीविग्रह महाभिषेक, महापूजा, घटस्थापना आणि श्री सप्तशती पाठारंभ करण्यात आला. पुढे प्रत्येक माळेला श्री सप्तशती पाठासह श्रींचे कुंकुमार्चन, हरिद्रार्चन, ऐलार्चन, पुष्पार्चन, शमी अर्चन, हिरण्यार्चन आणि बिल्वार्चन असे धार्मिक विधी होणार आहेत.

गुरुवार, दि. १५ रोजी पाचव्या माळेनिमित्त भगवतीभक्त चंद्रकांत भालेराव दादा यांच्या नवव्या पुण्यस्मरणानिमित्त सकाळी १० वाजता तारकेश्वर गडाचे महंत शांतिब्रह्म आदिनाथ महाराज शास्त्री यांचे जाहीर प्रवचन होणार आहे. बुधवारी दुपारी १२ वाजता रेडिओ स्टार राधिका ताई व मुक्ताताई उबाळे यांचा संगीत भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

याशिवाय अंबिका महिला भजनी मंडळ, ईशानी महिला भजनी मंडळ (पाथर्डी), अमरापूर भजनी मंडळ आणि चितळी भजनी मंडळ यांच्यासह पंचक्रोशीतील विविध भजनी मंडळांचे कार्यक्रम दररोज होणार आहेत.

सोमवार, दि. १९ रोजी श्री सप्तशती पाठ व नवरात्र होमास प्रारंभ होईल. दुपारी ४ वाजता नवरात्र होमाची पूर्णाहुती, रात्री ८ वाजता महानैवेद्य आणि रात्री ९ वाजता महाआरती होणार आहे.

मंगळवार, दि. २० रोजी श्रींची महापूजा व महाआरती, सकाळी ९ वाजता



ह.भ.प. राम महाराज हिंजुर्के यांचे जाहीर हरिकीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ५ वाजता भगवान श्री परशुराम पालखी मिरवणूक सोहळा व सीमोल्लंघन होणार आहे. नवरात्रोत्सवातील सर्व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन भगवतीभक्तानुरागी मंगलताई चंद्रकांत भालेराव यांनी केले आहे.

## तांदळी दुमाल्यात ५ मेगावॅट सोलर प्रकल्पाचे भूमिपूजन

**● श्रीगोंदा । वीरभूमी -**

शेतीला पूर्ण दाबाने वीजपुरवठा मिळण्याच्या दृष्टीने तांदळी दुमाला येथे आणखी एक महत्त्वाचे पाऊल पडले आहे. गावातील सबस्टेशन परिसरात ५ मेगावॅट सोलर प्रकल्पाच्या कामाचे भूमिपूजन रविवारी सकाळी १० वाजता ग्रामस्थांच्या उपस्थितीत उत्साहात करण्यात आले. यापूर्वी गावात १० मेगावॅटचा सोलर प्रकल्प पूर्ण झाला असून, नव्या प्रकल्पामुळे शेतीच्या वीजपुरवठ्याचा प्रश्न सुटण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

मान्यवरांच्या हस्ते नारळ फोडून प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. तांदळी दुमाला परिसरात शेतीसाठी पाण्याबरोबरच



अखंडित आणि योग्य दाबाने वीज मिळणे आवश्यक आहे. नव्याने उभारण्यात येणाऱ्या ५ मेगावॅटच्या प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना अधिक सक्षम वीजपुरवठा मिळण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या भूमिपूजन सोहळ्यास ज्येष्ठ नेते बापूसाहेब शेळके, हरिश्चंद्र शेळके, चेअरमन राजू भोस, उपसरपंच राजेंद्र भोस, मा. चेअरमन व मा. सरपंच संजय शेळके, ग्रामपंचायत सदस्य अण्णा धालवडे, संचालक निलेश शेळके, सूर्यभान पोळ, ह.भ.प. नवले महाराज, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ भोस, पोलीस पाटील अनिल शेळके, अध्यक्ष संतोष शिंदे, डॉ. पी. एम. भोस, प्रकाश बडे, गोरख बुनगे, राजू भोस, बाबा गव्हाणे, कैलास शेळके, प्रसाद भिवसने आणि युवा नेते अजय भाऊ शेळके यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपसरपंच राजेंद्र भोस, संचालक निलेश शेळके, डॉ. पी. एम. भोस, ह.भ.प. नवले महाराज आणि अध्यक्ष संतोष शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. युवा नेते अजय शेळके यांनी प्रस्तावित कामाची माहिती देत प्रकल्पाचे कृषी आणि गावाच्या वीजपुरवठ्याच्या दृष्टीने असलेले महत्त्व स्पष्ट केले.

दरम्यान, पुरस्कार सोहळ्यानिमित्त नाशिक येथे उपस्थित असलेले सरपंच संजय निगडे आणि उपसरपंच झुंबर खुरांगे यांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या.

## काँग्रेसमध्ये खळबळ! पारनेर तालुकाध्यक्षांच्या नियुक्तीवरून नाराजी; पदाधिकाऱ्यांचे सामूहिक राजीनामे

**● पारनेर । वीरभूमी –**

काँग्रेसमध्ये नूतन पारनेर तालुकाध्यक्षांच्या नियुक्तीवरून अंतर्गत वाद उफाळून आला आहे. बाबुर्डी गावचे सरपंच ॲड. ईश्वर दिवटे यांची पारनेर तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याने नाराज झालेल्या काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामे देण्याचा निर्णय घेतला आहे. माजी तालुकाध्यक्ष संभाजी रोहकले यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांनी पारनेर येथील विश्रामगृहात पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली. या घडामोडींमुळे तालुक्यातील काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद पुन्हा चर्चेत आले आहेत.

पत्रकार परिषदेला संभाजी रोहकले, कार्याध्यक्ष सुरेश मेसे, अल्पसंख्याक सेलचे उस्मानगनी इनामदार, युवक अध्यक्ष योगेश शिंदे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते. जिल्हाध्यक्षांना सादर केलेल्या राजीनामा पत्रात नियुक्ती प्रक्रियेबाबत अनेक मुद्दे मांडण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

नवनियुक्त तालुकाध्यक्ष पक्षाचे प्राथमिक सदस्य नसल्याचा तसेच ते यापूर्वी पक्षाच्या बैठका आणि कार्यक्रमांत सहभागी झाले नसल्याचा दावाही नाराज गटाने केला आहे. जुन्या कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता नियुक्ती करण्यात आल्याने संघटनेत नाराजी निर्माण झाल्याचे पदाधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.




## वीरभूमी
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा...!

युवा नेतृत्व
**रविंद्र उर्फ भोरु म्हस्के**

---

## वीरभूमी
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा...!

**रणजित भैय्या बेळगे**
तालुकाध्यक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, पाथर्डी

---

## वीरभूमी
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा...!

**प्रतिक नांगरे**
नगरसेवक, पाथर्डी नगरपरिषद

---

## वीरभूमी
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा...!



महाराष्ट्र शासन राज्यस्तरीय
पुरस्कार प्राप्त
**सुवर्णयुग तरुण मंडळ, पाथर्डी**

---

**श्री पावन गणपती उद्योग समूह**
श्री पावन गणपती मोबाईल
होलसेल व रिटेल विक्री
**श्री पावन गणपती लॉजिंग**
राहण्याची उत्तम सोय
Ac - Non Ac रूम उपलब्ध ..
माफक दरात सेवा
मोफत सेवा
पत्ता : शेवगाव रोड, मोरया कॉम्लेक्स समोर, पाथर्डी
९९२१७२४२४७/९३२२३३२७८८
श्री. आजिनाथ डोमकावळे
सामाजिक कार्यकर्ते

---

## वीरभूमी
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा...!

**इंजि. रामेश्वर शिवणकर**
**इंजि. ऋषिकेश पालवे**
**पंचायत समिती, पाथर्डी**

---

स्व. ना. ग. उर्फ बाबूजी आव्हाड
मा. आमदार, थोर स्वातंत्र्य सेनानी
लोकनेत्या ना. पंकजाताई मुंडे
मा. खा. डॉ. सुजयदादा विखे पा.
आ. मोनिकाताई राजळे

## वीरभूमी
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा...!

**मा. अभय आव्हाड**
नगराध्यक्ष, न. पा. पाथर्डी
अध्यक्ष, पार्थ विद्या प्रसारक मंडळ, पाथर्डी
मा. अधिसभा सदस्य, पुणे विद्यापीठ, पुणे

**पार्थ विद्या प्रसारक मंडळ**
पाथर्डी, जि. अहमदनगर

---

## वीरभूमी
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा...!



**पी.एम.श्री जिल्हा परिषद शाळा, पाथर्डी**

---

## वीरभूमी
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा...!

**रामनाथ द्वारकादास बंग**
माजी नगरसेवक, पाथर्डी नगरपरिषद

**सौ. दिपाली रामनाथ बंग**
माजी उपनगराध्यक्षा तथा विद्यमान नगरसेविका,
पाथर्डी नगरपरिषद

**रामनाथ बंग मित्र मंडळ, पाथर्डी**

---

## वीरभूमी
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

वारसा
संघर्षाचा..
अविरत
जनसेवेचा!

**ॲड. प्रतापराव ढाकणे (काका)**
अध्यक्ष : एकलव्य शिक्षण संस्था, पाथर्डी

---

पार्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित
**श्री विवेकानंद विद्यामंदिर पाथर्डी .**
**श्री विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर पाथर्डी.**

हीरक महोत्सवी वर्ष ६०




शैक्षणिक क्षेत्रात उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखणारे विद्यालय

✲ शुभेच्छुक ✲
**मा. अभय आव्हाड**
अध्यक्ष, पार्थ विद्या प्रसारक मंडळ, पाथर्डी
मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, पर्यवेक्षक व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी वृंद.

SPOT NEWS

## मूल्यवर्धन शिक्षण काळाची गरज

**नीळकंठ बोरुडे | होलेवाडीत शिक्षण परिषद**

**● श्रीगोंदा | वीरभूमी–**

विद्यार्थ्यांमध्ये चांगले संस्कार, सामाजिक जाणीव, सहकार्य, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीची भावना रुजविण्यासाठी मूल्यवर्धन शिक्षण काळाची गरज आहे, असे प्रतिपादन श्रीगोंदा पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी नीळकंठ बोरुडे यांनी केले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, होलेवाडी येथे लिंपणगाव केंद्रातील शिक्षकांसाठी मूल्यवर्धन उजळणी अंतर्गत केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. २०२५ मध्ये झालेल्या मूल्यवर्धन प्रशिक्षणानंतर वर्षभरात शाळांमध्ये राबविण्यात आलेले विविध उपक्रम, त्यांचे अनुभव आणि पुढील नियोजन यावर या परिषदेत चर्चा करण्यात आली.

परिषदेत शेंडेवाडी प्राथमिक शाळेचे भानुदास तांदळे आणि सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालय, लिंपणगाव येथील महादेव पवळ यांनी सुलभक म्हणून मार्गदर्शन केले. तांदळे यांनी विविध गीतांच्या माध्यमातून मूल्यवर्धन शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले, तर पवळ यांनी विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची जोपासना करताना त्यांचा सक्रिय सहभाग कसा वाढवावा, याबाबत मार्गदर्शन केले. शिक्षण विस्तार अधिकारी बोरुडे यांनी शालेय स्तरावर मूल्यवर्धनाचे उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन केले.

केंद्रप्रमुख रजनी नलगे यांनीही मूल्यवर्धन शिक्षणाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित शिक्षकांनी आपल्या शाळांमधील उपक्रम आणि अनुभव मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाना रसाळ यांनी केले. तर आभार ईश्वर गोरे यांनी केले. होलेवाडी शाळेचे मुख्याध्यापक भास्कर सातपुते यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. लिंपणगाव केंद्रातील प्राथमिक व माध्यमिक शाळांचे शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. खेळीमेळीच्या वातावरणात पार पडलेल्या या परिषदेतून मूल्याधिष्ठित शिक्षण अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# मोहटादेवी गडावर शारदीय नवरात्रोत्सवाची पारंपरिक पद्धतीने घटस्थापना

**सनई-चौघड्यांच्या मंगलमय निनादात नवरात्रोत्सवाला प्रारंभ; हजारो भाविकांची उपस्थिती**

**● पाथर्डी | वीरभूमी –**

महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावर शारदीय नवरात्रोत्सवाचा प्रारंभ भक्तिमय आणि मंगलमय वातावरणात झाला. देवस्थान समितीचे अध्यक्ष तथा धर्मादाय उपायुक्त नवनाथ जगताप आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. सुजाता जगताप यांच्या हस्ते पारंपरिक धार्मिक विधीनुसार घटस्थापना करण्यात आली. सनई-चौघड्यांचा व वाजंत्रीचा मंगलमय निनाद, देवीच्या जयघोषाने दुमदुमलेला परिसर आणि दर्शनासाठी उपस्थित भाविकांची गर्दी यामुळे मोहटागडावर भक्तीचा उत्साह अनुभवायला मिळाला.

शारदीय नवरात्रोत्सव हा आदिशक्तीच्या उपासनेचा, श्रद्धेचा आणि भक्तिभावाचा महत्त्वपूर्ण पर्व मानला जातो. नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी घटस्थापनेला विशेष धार्मिक महत्त्व असल्याने मोहटादेवी गडावर आदल्या दिवसापासूनच उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

महाराष्ट्रातील विविध गावांमधून हजारो तरुण वाजतगाजत मोहटादेवी गडावर दाखल झाले. मोहटा शक्तिपीठावरून ज्योत प्रज्वलित करून ती आपल्या गावी नेण्याची परंपरा अनेक गावांमध्ये आहे. तेथे नवरात्रोत्सवादरम्यान देवीसमोर ही अखंड ज्योत प्रज्वलित केली जाते. या परंपरेनुसार आदल्या दिवसापासूनच हजारो तरुण मोठ्या उत्साहात आई जगदंबेचा जागर करत वाजतगाजत गडावर दाखल झाले होते.

आज सकाळी विधिवत पूजाअर्चा व पारंपरिक धार्मिक सोपस्कार पार पडल्यानंतर देवस्थानचे विश्वस्त, अधिकारी व कर्मचारी तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत घटस्थापना करण्यात आली. सनई-चौघड्यांच्या मंगलध्वनीसह वाजंत्रीचा गजर आणि मंत्रोच्चाराने संपूर्ण गड परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

घटस्थापनेच्या मंगलमय सोहळ्यास देवस्थान समितीचे सर्व विश्वस्त उपस्थित होते. धार्मिक परंपरा व विधींचे पालन करून नवरात्रोत्सवाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने भाविकांनी मोहटादेवीच्या दर्शनासाठी उपस्थिती लावली. आदिमायेच्या चरणी नतमस्तक होत भाविकांनी सुख, समृद्धी, आरोग्य आणि कुटुंबाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली.



मोहटादेवी गडाला लाभलेली धार्मिक परंपरा आणि भाविकांच्या मनातील अढळ श्रद्धा यामुळे नवरात्रोत्सवाला विशेष महत्त्व आहे. उत्सवानिमित्त गडावर भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून, देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

पारंपरिक पद्धतीने झालेल्या घटस्थापनेने श्रीक्षेत्र मोहटादेवी गडावरील शारदीय नवरात्रोत्सवाला मंगलमय सुरुवात झाली. देवीच्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यामुळे गड परिसरात धार्मिक चैतन्य निर्माण झाले आहे.

## खरिप पिकांचे ७३ टक्के पंचनामे पूर्ण

**● अहिल्यानगर | वीरभूमी–**

खरीप हंगाम २०२६ मध्ये ट्रिगर-१ लागू झालेल्या नगर जिल्ह्यातील १४ तालुक्यांमध्ये बाधित पिकांचे पंचनामे करण्याचे काम प्रशासनाकडून वेगाने सुरू आहे. ९ ऑक्टोबरपर्यंत प्राप्त झालेल्या अधिकृत स्थिती अहवालानुसार, जिल्ह्यातील १ हजार ६१० गावांपैकी सर्व १६१० गावांमध्ये पंचनाम्याची प्रक्रिया पोहचली असून, प्रागतिक पातळीवर सुमारे ७२.८८ टक्के क्षेत्राचे पंचनामे पूर्ण झाले आहेत.

## आबासाहेबांनी निर्माण केलेला शिक्षण व समाजसेवेचा आदर्श प्रेरणादायी

**माजी उपमुख्याध्यापक विठ्ठलराव गमे | चापडगाव विद्यालयात कर्मयोगी आबासाहेब काकडे यांना अभिवादन**

**● शेवगाव | वीरभूमी –**

थोर समाजसेवकांच्या कार्यामुळे समाजमनावर त्यांची नावे आजही आदराने स्मरणात आहेत. कर्मयोगी आबासाहेब काकडे यांनी निर्माण केलेला शिक्षण आणि समाजसेवेचा आदर्श आजही प्रत्येक पिढीला प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन माजी उपमुख्याध्यापक विठ्ठलराव गमे यांनी केले.

चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कर्मयोगी आबासाहेब काकडे यांच्या ४८व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य संपत दसपुते, उपप्राचार्य सुनील जायभाये, पर्यवेक्षक संजय



दुधाडे, माजी प्राध्यापक सखाराम घावटे, प्रा. दादासाहेब ज्योतीक, अशोक आघवणे, वत्सला जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

विठ्ठलराव गमे म्हणाले, आबासाहेब काकडे हे अस्मानी आणि सुलतानी संकटांना सामोरे जाणारे गुणवान नेतृत्व होते. शेती, शिक्षण आणि पाणी या विषयांसाठी त्यांनी आपले संपूर्ण जीवन वाहून घेतले. त्यांच्या कार्याचा वारसा आजही त्यांचे चिरंजीव डॉ. विद्याधर काकडे व स्नुषा हर्षदाताई काकडे मोठ्या जोमाने पुढे नेत आहेत.

शिक्षक प्रतिनिधी म्हणून प्रा. दादासाहेब ज्योतीक यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, कर्मयोगी आबासाहेब काकडे यांनी विद्येचे महत्त्व जाणून ग्रामीण भागात शिक्षणाचे मोठे जाळे उभे केले. त्याचबरोबर वसतिगृहे सुरू केली. उपेक्षित, कष्टकरी आणि शेतकऱ्यांसाठी विविध लढ्यांमधून त्यांना न्याय मिळवून दिला. कर्मयोगी आबासाहेबांमुळे पुढील आणि मागील पिढीचा उद्धार झाला आहे. त्यांच्या कार्यातील किमान एक तरी गुण प्रत्येकाने आत्मसात करावा.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वत्सला जाधव यांनी केले. देवेंद्र लांडे यांनी अनुमोदन दिले, तर सूत्रसंचालन सर्जेराव निकाळजे यांनी केले. अक्षय पुरनाळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## अगस्ती विद्यालयात वाचन सप्ताहानिमित्त प्रश्नमंजुषा

**वाचन संस्कृती रुजविण्यासाठी ग्रंथालय विभागाचा स्तुत्य उपक्रम**

**● अकोले | वीरभूमी –**

भारतरत्न, माजी राष्ट्रपती व थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर हा दिवस देशभरात ‘वाचन प्रेरणा दिन’ म्हणून साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून अगस्ती विद्यालय, अकोले येथे विद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्या ज्ञानाची व्याप्ती वाढावी आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन मिळावे, यासाठी विविध शैक्षणिक व बौद्धिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.




या उपक्रमांच्या मालिकेत शनिवार, दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी विद्यालयात प्रश्नमंजुषा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सामान्यज्ञानाला चालना मिळण्याबरोबरच त्यांची जिज्ञासा, आकलनशक्ती आणि वाचनातून मिळविलेल्या ज्ञानाची पडताळणी करण्याची संधी उपलब्ध झाली.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यालयाचे प्राचार्य शिंदे सर यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारांना योग्य दिशा मिळते आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. विद्यार्थ्यांनी पाठ्यपुस्तकांबरोबरच अवांतर वाचनाची सवय जोपासून ज्ञानाच्या विविध क्षेत्रांत प्रगती साधावी, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यालयाच्या ग्रंथालय विभागाचे प्रमुख जी. आर. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली वाचन सप्ताहांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून वाचनाची गोडी निर्माण करावी, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे.

‘वाचाल तर वाचाल’ या विचाराला कृतीची जोड देत अगस्ती विद्यालयाचा ग्रंथालय विभाग विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, जिज्ञासा आणि वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. वाचन सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पुस्तकांशी जोडण्याचा तसेच त्यांच्या बौद्धिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न केला जात आहे.










जाहीरात संकलन :- श्री. भगवान गायकवाड, पारनेर तालुका प्रतिनिधी, मो. ९८५०८५८३३३

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयात पोस्टर प्रदर्शन स्पर्धा

## जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त मानसशास्त्र विभागाचा उपक्रम । ३७ विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**● पाथर्डी । वीरभूमी –** विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी तसेच आनंदी आणि अर्थपूर्ण जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक व्हावा, या उद्देशाने जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागाच्या वतीने मानसिक आजार आणि मानसिक आरोग्याची निगा राखण्यासाठी उपलब्ध सुविधांवर आधारित भव्य पोस्टर प्रदर्शन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



या स्पर्धेत एकूण ३७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी ३७ प्रकारच्या मानसिक आजारांची माहिती पोस्टरच्या माध्यमातून सादर केली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन बोधेगाव येथील आबासाहेब काकडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मच्छिंद्र फसले यांच्या हस्ते करण्यात आले. मार्गदर्शन करताना त्यांनी आजच्या धकाधकीच्या युगात मानसिक आरोग्याची काळजी घेणे किती महत्त्वाचे आहे, यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन अधिक व्यापक होण्यास मदत होते, असे मत व्यक्त करून त्यांनी विद्यार्थ्यांना सादरीकरणासाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. अर्जुन केळकर आणि डॉ. प्रशांत साळवे यांनी काम पाहिले. त्यांनी प्रत्येक पोस्टरचे बारकाईने निरीक्षण केले. मानसिक आजारांचे गांभीर्य तसेच त्यावरील उपाययोजना पोस्टरच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे त्यांनी कौतुक केले.

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातून सर्वोत्कृष्ट तीन क्रमांक निवडण्यात आले. प्रथम तीन क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे १,००१, ७०१ आणि ५०१ रुपयांचे रोख बक्षीस व सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मानसशास्त्र विभागप्रमुख डॉ. अभिमन्यू ढोरमारे यांनी केले. त्यांनी जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे महत्त्व तसेच पोस्टर प्रदर्शन स्पर्धेमागील उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. शरद बोडखे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी व्यासपीठावर डॉ. अशोक कानडे व डॉ. अरुण राख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. विजयकुमार मस्के, प्रा. सचिन पालवे आणि प्रा. ब्रह्मानंद दराडे यांनी प्रयत्न केले.

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने उपस्थित विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट देत विद्यार्थ्यांच्या कलाकृतींची पाहणी केली. ज्येष्ठ पत्रकार अविनाश मंत्री आणि प्रा. रमेश मोरगावकर यांनीही प्रदर्शनाला भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# नेप्तीत तुळजापूरहून आणलेल्या पायी ज्योतीच्या साक्षीने घटस्थापना

**● अहिल्यानगर । वीरभूमी –** नगर तालुक्यातील नेप्ती येथे शारदीय नवरात्रोत्सवाची सुरुवात भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाली. श्रीक्षेत्र तुळजापूर ते नेप्ती पायी ज्योत सोहळ्यानिमित्त तुळजापूरहून आणलेल्या पवित्र ज्योतीचे ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत केले. जय भवानी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या सोहळ्याचे यंदा चौथे वर्ष होते. गावातील एकोपा वृद्धिंगत व्हावा, तरुणांमध्ये धार्मिक व सांस्कृतिक परंपरांबद्दल आस्था निर्माण व्हावी आणि भक्तिभाव अधिक दृढ व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती रामदास फुले यांनी दिली.

दि. ८ ऑक्टोबर रोजी प्रतिष्ठानचे कार्यकर्ते श्रीक्षेत्र तुळजापूर येथे गेले होते. तेथे भवानी माता मंदिरात दर्शन घेतल्यानंतर अखंड तेवत असलेल्या ज्योतीपासून पवित्र ज्योत प्रज्वलित करण्यात आली. ही ज्योत अखंड तेवत राहावी, यासाठी विशेष काळजी घेत कार्यकर्त्यांनी दोन दिवसांच्या प्रवासानंतर ती नेप्तीत आणली.

या धार्मिक उपक्रमात शेखर कांडेकर, गणेश जपकर, दादाभाऊ जपकर, अभिजीत जपकर, योगेश होळकर, समाधान जपकर, विकास जपकर, नितीन येवले, गणेश कांडेकर, सनी त्रिंबके, कुमार होळकर, आदित्य जपकर, प्रवीण चौगुले, भाऊ दळवी, अरुण पाचारणे, रोहित गव्हाणे आणि प्रतीक त्रिंबके यांनी सहभाग घेतला.

तुळजापूरहून आणलेल्या पवित्र ज्योतीचे नेप्ती बायपास चौकात आगमन होताच स्वागतासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली. महिलांनी पंचारतीने ज्योतीला ओवाळून, हळदी-कुंकू लावून पूजन केले. ग्रामस्थांनी पुष्पहार अर्पण करून आणि फटाक्यांची आतषबाजी करत ज्योतीचे स्वागत केले.

त्यानंतर बायपास चौकापासून देवी मंदिरापर्यंत वाद्यांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. 'आई राजा उदो उदो'च्या जयघोषात भाविक सहभागी झाले होते. गावातील महिलांनी घरांसमोर सडा टाकून आकर्षक रांगोळ्या काढल्याने संपूर्ण परिसराला उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले होते.





वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

**श्री रुक्मिणी सहकारी बँक लि.**
मुख्य कार्यालय व शाखा- श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा

सीए. श्री. वसंतराव गुंड – चेअरमन
सीए. श्री. सुरेश रावसाहेब गावडे – व्हा. चेअरमन

* संचालक *
श्री. भास्कर सिद्धाम माने, श्री. दिनकर मा. सोनवणे, श्री. नामदेव रोहीदास कुरुमकर, श्री. शहाजी कृष्णांत गायकवाड, श्री. अशोक गणपत कोल्हे, ॲड. पांडुरंग विठ्ठल गुंड, श्री. सुभाष मच्छिंद्र काळाणे, श्री. महिपत बाळासाहेब नलवडे, श्री. महेश बाळासाहेब नागवडे, श्री. भगवान म्हसा लकडे, श्री. बाळासाहेब भास्कर जगताप, सौ. अलका राधू शिंगाडे, श्रीमती कौशल्या जालिंदर जगताप, श्रीमती रोहीणी भाऊसाहेब रोडे, सौ. शकुंतला रत्नाकर महामुनी

* व्यवस्थापन मंडळ *
ॲड. श्री. पांडुरंग विठ्ठल गुंड (चेअरमन)
* सदस्य *
सीए. श्री. सुरेश रावसाहेब गावडे, श्री. नितीन चंद्रकांत दळवी, श्री. सुनिल जगदिश बोटलवार, श्री. धैर्यशील शशिकांत माने
व सर्व कर्मचारी वृंद

वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

**राजमाता जिजाऊ नागरी सहकारी पतसंस्था मर्या, श्रीगोंदा**

श्री. प्रकाश दादासाहेब निंभोरे – चेअरमन
श्री. बाळासाहेब नामदेव भोर – व्हा. चेअरमन
श्री. संजय सोनवणे – व्यवस्थापक

* संचालक *
श्री. काशिनाथ हौसराव बारगुजे, श्री. महेंद्र चंद्रकांत गायकवाड, श्री. माधव शिवराम बनसुडे, श्री. जालिंदर सिताराम बनकर, श्री. सागर नाना दरेकर, श्री. सुभाष भिमराव लोखंडे, श्री. रघुनाथ नामदेव सप्ताळ, श्री. सागर रामनाथ पठारे, सौ. ज्योती प्रकाश निंभोरे, सौ. योगिता सुभाष शितोळे, ॲड. रमेश सदाशिव जठार (कायदेशिर सल्लागार)

वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!



श्री. वामन अनाजी खाडे – ग्रामविकास अधिकारी
सौ. सुनिता दत्तात्रय उंडे – उपसरपंच
श्री. प्रमोद नामदेवराव शिंदे – लोकनियुक्त सरपंच

सदस्य
श्री. राजकुमार महादेव उंडे, श्री. राहुल भाऊसाहेब साळवे, श्री. योगेश गोपीनाथ शिंदे, सौ. अमृता आनंदा ससाणे, सौ. सोनाली नवनाथ उंडे, सौ. मंगल गोरख गोरे, श्री. अभयसिंह संतोषकुमार गुंड, सौ. रंजना बबन गोरे, श्री. संतोष नारायण गायकवाड, सौ. रेश्मा राहुल शिंदे, श्री. योगेश अंबादास मांडे, सौ. सुरेखा बाळासाहेब फापाळे
ग्रामपंचायत कर्मचारी व सर्व ग्रामस्थ

**ग्रामपंचायत मढेवडगाव, ता. श्रीगोंदा**

वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

सदैव आपल्या सेवेत || सत्फलाय सहकारिता ||
रजि.नं. ANR/SGA/RSR/CR/1225/29-11-97

**खुलेश्वर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.**

मुख्य कार्यालय : काष्टी, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर
काष्टी शाखा : फोन (०२४८७) २३१२७७, श्रीगोंदा शाखा (०२४८७) २२०९७७

* ६० दिवसांकरिता ७%
* ९० दिवसांकरिता ८%
* १८० दिवसांकरिता ९%
* २७० दिवसांकरिता १०%
* ३६६ दिवसांकरिता १०.५%
* सेव्हिंग व्याजदर ६%
* दामदुप्पट ठेव योजना ७८ महिने
* ठेवींवर आकर्षक व्याजदर

* संस्थेची वैशिष्ट्ये *
■ संपूर्ण संगणकीय कामकाज, ■ प्रशिक्षित अनुभवी आणि विनम्र सेवक वृंद, ■ त्वरीत व तत्पर सेवा, ■ एस.एम.एस. सुविधा उपलब्ध, ■ मोबाईल कलेक्शन सुविधा, ■ आरटीजीएस/एनईएफटी सुविधा, ■ ज्येष्ठ नागरिक, महिला व अपंगासाठी घर पोहोच सुविधा, ■ केवळ व्यवसाय नव्हे तर सामाजिक बांधिलकी जपत सेवा देणारी पतसंस्था

* अधिकृत भांडवल- ६ कोटी- ६०० लक्ष
* वसुल भांडवल- ३४०५५३००- ३४० लक्ष
* स्वनिधी- ७६९७१३८६- १६९ लक्ष
* ठेवी- ६३६७७९०२८- ६३६७ लक्ष
* कर्ज- ५३००००००- ५३०० लक्ष
* गुंतवणूक- १६३८५८०५४- १६३८ लक्ष
* बँक शिल्लक- ३६९२५५४२- ३६९ लक्ष
(वरील आकडेवारी ही ३१/०३/२०२६ पर्यंतची आहे)



श्री. लालासाहेब फाळके (मार्गदर्शक) श्री. सुनिल (तात्या) दरेकर (चेअरमन) श्री. वैभवदादा पाचपुते (व्हा. चेअरमन)

संचालक मंडळ : श्री. ज्ञानदेव विठ्ठलराव नलगे, श्री. अनिल साहेबराव दांगट, श्री. माणिक मारुती थोरात, श्री. प्रदिप सखाराम पाचपुते, श्री. यादव शिवबा हराळ, श्री. सुरेश महादेव शेंडगे, सौ. ललिता लालासाहेब फाळके, सौ. मीना अशोक खंडके, सौ. सपना जयवंत बोत्रे, श्री. किसन गुलाबराव बाराते (व्यस्थापकीय संचालक), श्री. निलेश बाळासाहेब जगताप (शाखाधिकारी काष्टी), श्री. भिव्राज भानुदास निकम (शाखाधिकारी श्रीगोंदा), श्री. बापू यादव हराळ (वसुली अधिकारी) व संस्थेचे सर्व सभासद, कर्मचारी व दै. प्रतिनिधी

**इथे वृद्धी.. इथे समृद्धी..**



वीरभूमी वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

विविध लाभदायी योजना

**चैतन्य पेन्शन ठेव योजना**
१ लाख रुपयांच्या ठेवीवर दरमहा मिळवा

| कालावधी | दरमहा मिळवा |
|---|---|
| १२ ते २४ महिने | रु. ८३३/- |
| २४ ते ३६ महिने | रु. ८७५/- |
| ३६ ते ४८ महिने | रु. ९१३/- |

**लेक लाडकी योजना**
मुलीच्या जन्मावेळी रु. ११,००० भरा व १८ वर्षांनंतर
रु. १,००,००० मिळवा

**सौभाग्यवती योजना**

| भरणा (प्रति महिना) | कालावधी | जमा होणारी रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|
| १८०० | ३६ महिने | ६४८०० | ७५००० |
| ३६०० | ३६ महिने | १२९६०० | १५०००० |

दामदुप्पट ८५ महिन्यात
नियम व अटी लागू

**सुकन्या योजना**

| भरणा (प्रति महिना) | कालावधी | जमा होणारी रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|
| १२५० | ३४ महिने | ४२५०० | ५०००० |
| २५०० | ३४ महिने | ८५००० | १००००० |
| ५००० | ३४ महिने | १७०००० | २००००० |

11% सर्वाधिक व्याजदर

**मुदत ठेवींवर आकर्षक व्याजदर**

| मुदत | व्याजदर |
|---|---|
| ३१ ते ९० दिवस | ५.५०% |
| ९१ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते २७० दिवस | ९.००% |
| २७१ ते ३६५ दिवस | १०.५०% |
| १३ महिने ते २ वर्ष | ११.००% |
| २५ महिने ते ३ वर्ष | ११.५०% |
| ३७ महिने ते ५ वर्ष | १२.००% |

**वृध्देश्वर अर्बन**
मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. श्रीगोंदा

मुख्य शाखा : ओम चैतन्य कॉम्प्लेक्स, तहसिल कचेरी समोर, श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर.
91300 80840 | 99755 81683
www.vrudheshwarmultistate.com

शाखा – दौंड । केडगाव । श्रीगोंदा । जामखेड । पारगाव सुद्रिक । पारगाव फाटा । अहिल्यानगर । आळंदी । सदाशिव पेठ । पंढरपूर । बारामती । चऱ्होली

वृध्देश्वर अर्बन | ओम चैतन्य ॲग्रो मॉल | चैतन्य कृषी उत्पन्न बाजार समिती (खाजगी) | चैतन्य ट्रेडींग कंपनी | चैतन्य महिला बचत गटाची सहकारी संस्था | चैतन्य स्टोन क्रशर प्रा. लि. | चैतन्य शॉपिंग कॉम्प्लेक्स | चैतन्य बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था, श्रीगोंदा



**मा. श्री. विठ्ठलराव वाडगे पा.** संस्थापक/अध्यक्ष

SPOT NEWS



## रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीतर्फे पाच शिक्षकांना 'नेशन बिल्डर' पुरस्कार प्रदान

**● शेवगाव । वीरभूमी –**

शिस्तप्रियता, क्षमतांचा योग्य उपयोग आणि सर्वांगीण गुणसंपन्न विद्यार्थी घडविण्याची क्षमता असलेले तसेच समाजाशी बांधिलकी जपणारे शिक्षक हे खऱ्या अर्थाने राष्ट्र उभारणीचे शिल्पकार आहेत, असे प्रतिपादन जालना येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या (डाएट) अधिव्याख्याता डॉ. वैशाली जहागीरदार यांनी केले. रोटरी क्लब ऑफ शेवगाव सिटीच्या वतीने येथील पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित कार्यक्रमात तालुक्यातील पाच शिक्षकांना उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल 'नेशन बिल्डर' अर्थात 'राष्ट्र उभारणीचे शिल्पकार' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच 'उमेद वाचन चळवळीत' उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. शंकर गाडेकर यांना विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. वैशाली जहागीरदार यांच्या हस्ते पुरस्कारार्थींना स्मृतिचिन्ह, प्रशस्तिपत्र, शाल व पुस्तक देऊन गौरविण्यात आले. यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लबचे डॉ. पुरुषोत्तम बिहाणी होते. यावेळी सहप्रांतपाल माधवराव देशमुख व भागनाथ काटे, सचिव डॉ. गजानन लोंढे तसेच अहिल्यानगर रोटरी क्लबचे अध्यक्ष राहुल क्षिरसागर उपस्थित होते. यावेळी डॉ. संतोषकुमार राठोड (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, ठाकूर पिंपळगाव), देविदास गरकळ (हातगाव), संजय शिंदे (मुख्याध्यापक, न्यू इंग्लिश स्कूल, आखेगाव), मलेका अजिममोद्दिन (शेवगाव) आणि प्रवीण नेहूल (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, एरंडगाव) यांना 'नेशन बिल्डर' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाला युसूफखान पठाण, डॉ. संजय लड्ढा, प्रकल्पप्रमुख मोहम्मद वसीम, कैलास कचरे, संतोष ढाकणे, डॉ. आशिष लाहोटी, मनेष बाहेती यांच्यासह शिक्षक व शिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. काकासाहेब लांडे यांनी केले. निलेश मोरे यांनी सूत्रसंचालन केले, तर रोटरी क्लबचे सचिव प्रा. गजानन लोंढे यांनी आभार मानले.

# अकोल्याच्या विकासासाठी राजकीय मतभेद बाजूला ठेवा

## डॉ. सुजय विखे पाटील । जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय नेत्यांना समन्वयाचे आवाहन

**● अकोले । वीरभूमी –**

राजकारणात आरोप-प्रत्यारोप, मतभेद आणि निवडणुकीतील संघर्ष हा लोकशाहीचा भाग असला, तरी शेतकऱ्यांचे प्रश्न, पाण्याचे नियोजन आणि तालुक्याच्या विकासासाठी सर्व राजकीय पक्षांनी एकत्र येणे आवश्यक आहे. राजकीय मतभेद असले, तरी आम्ही एकमेकांचे शत्रू नाही. शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आम्ही सर्वजण एक आहोत, अशी स्पष्ट भूमिका भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी मांडली

नवरात्री घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर राजूर येथे बाळासाहेब आरोटे यांनी सुरू केलेल्या 'हृदया कलेक्शन' या दालनाचे उद्घाटन डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते आमदार किरण लहामटे आणि माजी आमदार वैभवराव पिचड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी डॉ. विखे पाटील यांनी आरोटे परिवाराला व्यवसायाच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला विविध राजकीय पक्षांतील नेत्यांची उपस्थिती होती.

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अकोले तालुक्यातील राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना डॉ. विखे पाटील यांनी सर्वपक्षीय नेत्यांना विकासाच्या मुद्द्यांवर एकत्र येण्याचे आवाहन केले. जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने अकोले तालुक्यात येताना काहीशी काळजी वाटत होती, अशी मिश्कील टिप्पणी करत त्यांनी तालुक्यातील राजकीय वातावरणाकडे लक्ष वेधले.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत अकोले तालुक्यातील विविध प्रवर्गांतून मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज दाखल झाल्याचा उल्लेख त्यांनी केला. यावरून तालुक्यातील राजकीय जागरूकता आणि सहकार क्षेत्रातील सक्रियता स्पष्ट होते. अकोले तालुक्याला वैचारिकतेची परंपरा लाभली आहे. राजकीय मतभेद असतानाही तालुक्याच्या प्रश्नांवर एकत्र काम करण्याची तयारी लोकप्रतिनिधींनी दाखवली, तर विकासाला अधिक गती मिळू शकते, असे त्यांनी नमूद केले.

स्वर्गीय बाळासाहेब विखे पाटील यांच्यापासून विखे पाटील परिवाराने जिल्ह्याच्या विकासासाठी काम केले आहे. अकोले तालुक्याशीही परिवाराचे जुने संबंध आहेत, असे सांगत डॉ. विखे पाटील यांनी सर्वपक्षीय नेत्यांनी केलेल्या स्वागताबद्दल आभार मानले.

बाळासाहेब आरोटे यांनी जपलेली माणुसकी, नाती आणि सर्वांना सोबत घेऊन जाण्याची वृत्ती यामुळे वेगवेगळ्या राजकीय विचारांचे नेते एकाच व्यासपीठावर उपस्थित राहिल्याचे त्यांनी नमूद केले. राजकारणात मतभेद असणे स्वाभाविक आहे; मात्र त्यामुळे वैयक्तिक संबंधांमध्ये कटुता निर्माण होऊ नये. परस्परांचा सन्मान राखत संवादाची परंपरा कायम ठेवली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



आपल्या राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीचे अनुभव सांगताना डॉ. विखे पाटील यांनी राजकीय प्रतिमा आणि पेहरावावर मिश्कील भाष्य केले. पूर्वी पांढरे शुभ्र कपडे घातलेल्या कार्यकर्त्यांना मिळणाऱ्या स्वागताचा अनुभव सांगत त्यांनी उपस्थितांना हसवले. मात्र, केवळ पेहरावावरून माणसाचे मूल्यमापन करता येत नाही. माणसाचे कार्य, कर्तृत्व आणि समाजासाठी केलेले काम हीच त्याची खरी ओळख असते, असे त्यांनी स्पष्ट केले.

आमदार किरण लहामटे यांच्याशी संवाद साधताना, तुम्ही माझ्या एका शब्दाला मान दिलात, तर मीही तुमच्या दहा शब्दांना मान देईन,' असे सांगत त्यांनी परस्पर सन्मान आणि संवादाचे महत्त्व अधोरेखित केले.

अकोले तालुक्यातील पाणीप्रश्न, शेती आणि शेतकऱ्यांच्या अडचणींवर तोडगा काढण्यासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी एकत्र काम करणे आवश्यक असल्याचे डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट केले. शेतकरी अडचणीत असताना राजकीय मतभेदांपेक्षा त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. विकासाच्या मुद्द्यांवर संवाद साधून प्रश्न सोडविण्याची जबाबदारी सर्वांची आहे, असे त्यांनी सांगितले.

जिल्हा बँकेची निवडणूक असो किंवा तालुक्यातील पाणी आणि विकासाचे प्रश्न, राजकीय स्पर्धा कायम राहणारच; मात्र सार्वजनिक हिताच्या विषयांवर सहकार्याची भूमिका असली पाहिजे. अकोले तालुक्याची वैचारिक परंपरा जपत सर्वपक्षीय नेत्यांनी समन्वयाने पुढे यावे, हीच आपली अपेक्षा असल्याचे डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी आमदार किरण लहामटे, माजी आमदार वैभवराव पिचड, अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सीताराम गायकर, मधुभाऊ नवले, योगी केशव बाबा, कैलासराव वाकचौरे, कुंजीर साहेब यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, आरोटे परिवारातील सदस्य आणि नागरिक उपस्थित होते.




## जागृत देवस्थान मळगंगा देवी मंदिरात उत्साहात घटस्थापना



**● निघोज । वीरभूमी–**

राज्यातील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या मळगंगा देवीच्या मंदिरात रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजताच्या शुभमुहूर्तावर पारंपरिक पद्धतीने घटस्थापना करण्यात आली. यावेळी पोपट महाराज देशपांडे यांनी पौरोहित्य केले. देवीचे पुजारी म्हणून गायखे कुटुंबीय अनेक पिढ्यांपासून सेवा बजावत आहेत. या कुटुंबातील ग्रामपंचायत सदस्या रुपाली ठकाराम गायखे, मळगंगा बचत गटाच्या अध्यक्षा सविता हरिभाऊ गायखे, सुवर्णा सुनील गायखे आणि संध्या संतोष गायखे यांनी घटस्थापना करून देवीचे दर्शन घेतले. राज्य दुष्काळमुक्त व्हावे आणि सर्वत्र सुख, समाधान, शांती व समृद्धी नांदावी, अशी प्रार्थना त्यांनी देवीच्या चरणी केली.

रविवारी पहाटे तीन वाजता देवीचे पुजारी सुनील हरिभाऊ गायखे यांनी देवीची पूजा व अभिषेक केला. त्यानंतर येथील गोंधळी कुटुंबातील सदस्यांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली. सकाळी पाच वाजल्यापासूनच देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होऊ लागली. मळगंगा देवी नवसाला पावणारी देवी म्हणून प्रसिद्ध असून, नवरात्रोत्सव तसेच चैत्र महिन्यात होणाऱ्या यात्रेदरम्यान राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात.

मळगंगा देवीच्या मंदिरातील एक वैशिष्ट्यपूर्ण परंपरा म्हणजे भाविकांनी गाभाऱ्यात अर्पण केलेल्या समया. विविध कुटुंबांकडून मंदिरात समया आणून दिल्या जातात. या समया रात्रंदिवस तेवत ठेवल्या जातात. समयांची संख्या हजारोंच्या पुढे असल्याने त्या ठेवण्यासाठी मंदिराशेजारील खोलीत स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. या परंपरेमुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होते.

नवरात्रोत्सवानिमित्त मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टच्या वतीने नऊ दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज दुपारी १ ते ५: भजनांजली कार्यक्रम. दि. ११ ते १५ ऑक्टोबर, रात्री ८ ते ११: दांडिया रास. यामध्ये परिसरातील शेकडो महिला व युवती सहभागी होतात. शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर: पियाताई सातपुते प्रस्तुत 'स्वामी मल्हार व भक्तिसंगीत' कार्यक्रम. शनिवार, दि. १७ ऑक्टोबर: सचिन कवठेकर यांचा 'खेळ पैठणीचा' कार्यक्रम. रविवार, दि. १८ ऑक्टोबर: भव्य रेकॉर्ड डान्स स्पर्धा. या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.










दैनिक वीरभूमी वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा...!

अहिल्यानगर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., अहिल्यानगर

मुख्यकार्यालय : ऐक्य मंदिर, आनंदी बाजार, अहिल्यानगर ४१४००१
ई-मेल- headoffice@azpss.bank.in, फोन - ९२२५३२४०३२, ९२२५३२४०३५

आमच्याकडे स्विकारल्या जातात सर्व नागरिकांच्या ठेवी
दि. १५ मार्च २०२५ पासून सुधारीत व्याजदर

| मुदत | व्याजदर |
|---|---|
| ०७ दिवस ते १४ दिवस | ३.२५% |
| १५ दिवस ते ३० दिवस | ३.५०% |
| ३१ दिवस ते ९० दिवस | ४.५०% |
| ९१ दिवस ते १५० दिवस | ५.००% |
| १५१ दिवस ते २१० दिवस | ५.५०% |
| २११ दिवस ते ३५० दिवस | ६.५०% |
| ३५१ दिवस व त्यापुढे | ७.००% |

दि. ३०/०६/२०२६ अखेर बँकेची सांपत्तीक स्थिती (रक्कम लाखात)

| | |
|---|---|
| ● वसूल भाग भांडवल | ९२७३.५४ |
| ● निधी | ४३८०.०५ |
| ● ठेवी | १६५९४२.७४ |
| ● खेळते भांडवल | १८६०५२.९० |
| ● गुंतवणूक | ६३१९७.५९ |
| ● कर्जे | ११४४०९.५९ |

आमच्याकडे येतो आहे ठेवीचा प्रचंड ओघ कारण...
● ठेवींना आकर्षक व्याजदर व विमा संरक्षण ● सेव्हिंग्ज ठेवीदारांना ऐच्छिक विमा सुविधा ● विनम्र व तत्पर सेवा. ● कर्जदारांकडून १०० टक्के दरमहा वसुली ● अत्यल्प थकबाकी ● सतत ऑडिट वर्ग ''अ'' ● लॉकर सुविधा उपलब्ध आहे. ● एटीएम, एनईएफटी, आरटीजीएस तसेच ए. बी. बी. सुविधा उपलब्ध आहे. ● बँकेने सभासदांसाठी वाहन तारण कर्ज, घर कर्ज, शैक्षणिक कर्ज, वैद्यकिय कर्ज व सोने तारण कर्ज तसेच सोलर कर्ज सुविधा सुरु आहे. ● दुसऱ्या व चौथ्या रविवारी मुख्य कार्यालय व सर्व शाखांचे कामकाज पूर्ण बंद राहील. इतर रविवारी बँकेचे कामकाज पुर्ण दिवस चालू राहील. ● साप्ताहिक सुट्टी सोमवारी राहील.
● आमचेकडे सर्वांसाठी सक्षम अशी आय.एम.पी.एस. आणि यु.पी.आय. सुविधा उपलब्ध आहे.

● ज्येष्ठ नागरिकांकरीता ठेवींवर ०.५० टक्के जादा व्याजदर ● दामदुप्पट ठेव १२० महिने ● दिडपट ठेव ७१ महिने ● स्पेशल सेव्हिंग्ज ठेवी करीता ४.५० टक्के ● रु. २५ लाख व त्यापुढील एकरकमी ठेवींसाठी ०.२५ टक्के व्याजदर ज्यादा राहील.

श्री. सुर्यकांत जगताप (मुख्यकार्यकारी अधिकारी) श्री. शिवाजी कराड (व्हा. चेअरमन) श्रीम. सरस्वती घुले (चेअरमन)

* संचालक मंडळ - श्री. गोरक्षनाथ विटनोर, श्री. ज्ञानेश्वर शिरसाट, श्री. बाळासाहेब तापकिर, श्री. योगेश वाघमारे, श्री. बाळू सरोदे, श्री. रमेश गोरे, श्री. रामेश्वर चोपडे, श्रीम. निर्गुणा बांगर, डॉ.श्री. संदिप मोटे, श्री. कैलास सारोक्ते, श्री. भाऊराव राहिंज, श्री. महेंद्र भणभणे, श्री. सुर्यकांत काळे, श्री. शशिकांत जेजुरकर, श्री. संतोषकुमार राऊत, श्री. कल्याण लवांडे, श्री. आण्णासाहेब आभाळे, श्री. माणिक कदम, श्री. कारभारी बाबर, श्री. राजेंद्र कुदनर, श्री. विजय नरवडे, श्री. गणेश पाटील (उप मुख्यकार्यकारी अधिकारी)



"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" ॥ कर्मवीर ॥

वीरभूमी
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा...!



रयत शिक्षण संस्थेचे
**श्री. सद्गुरु गंगागीर महाराज गौतम आर्टस् अँण्ड संजीवनी कॉमर्स कॉलेज**
कोपरगाव, जि. अहिल्यानगर ४२३६०१

**प्राचार्य डॉ. माधव सरोदे**
शिक्षक व शिक्षकेतर सेवक, सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी

Godavari Biorefineries Ltd
**GODAVARI BIOREFINERIES LTD.**
Wa are Biorefining company producing sugar, chemicals and waxes
Somaiya GROUP

वीरभूमी
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...!

- Industrial Grade sugar
- Rectified Sprit
- Acetic Acid
- Sorbic Acid
- 1, 3, Butylene glycol
- Ethyl Lactate
- Project under development
- Ethanol Based Hand-Sanitizer (PAAVAN)
- Pharma Grade Sugar
- Perfumery Grade Alcohol
- Ethyl Acetate
- 3- Methyl-3Penten-2-one
- Triethoxy Butane
- Pharma Grade Alcohole
- Crotonaldehyde Diurea
- Extra Neutral Alcohol
- Acetaldehyde
- Crotonaldehyde
- Paraldehyde
- Crotononitrile
- Nautrowax
- 2- Ethyl-1- Butanol

**Register Office**
Somaiya Bhavan, 45-47, MG Road,
Post box no. 384 Fort, Mumbai-400023,
Ph.no. 02222048272, 22858430

**Factory**
1. Po, Sakarwadi- 413708, Tal-Kopargaon, Dist- Ahmednagar (M.S)
2. Sameerwadi (via Mahalingpur), Dist. Bagalkot, Kamataka.

Since 1986
**समता पतसंस्था**
टेन्शन नाही, रिटर्न्स निवडा!

# दिनांक ११/५/२०२६ रोजी वार्षिक सर्वासाधारण सभा संपल्या नंतर
# १५% लाभांश
# सभासदांच्या खात्यामध्ये जमा




सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार आणि हितचिंतक यांचे जाहीर आभार...

**ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे**
चेअरमन, संचालक मंडळ व सर्व कर्मचारी वृंद
**समता पतसंस्था**

सर्वा विद्याची योषदा
**SANJIVANI UNIVERSITY**



Mr. Prasad Parjane 32 LPA | Mr. Vikram Jagtap 30 LPA | Mr. Rahul Jagdhane 27 LPA | Ms. Vaishnavi Mohadkar 27 LPA | Mr. Prathamesh Sonawane 27 LPA

From Campus to High-Paying Careers

वीरभूमी
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा...!



Ms. Riddhi Rawal 22 LPA | Ms. Dnyaneshwari Dolzake 21 LPA | Mr. Yashodeep Bhamare 21 LPA | Mr. Rushikesh Wabale 21 LPA

HIGHEST PACKAGE ₹32 LPA

**B. TECH** AI-ML | AI-DS | CYBER | CSE | MECH

INTEGRATED M. TECH (After 10th & 12th) | MBA | MCA | B.Pharm | B. Sc. | Ph. D.
INTEGRATED B. TECH (After 10th & 12th) | BBA | BCA | B. Com | M. Sc.

Foreign Languages ▸ An Integral Part of the Curriculum : JAPANESE | GERMAN | KOREAN | FRENCH | RUSSIAN

Industry Powered Curriculum Partners: IBM, FORTINET, NASSCOM, TCS, ICT, VIGNAN ASHRAM, MYTEK, coursera, AUDI, HCL, BAJAJ FINSERV, SAP, aws, NPTEL

20+ Global University Collaborations
43+ Industry Collaborations
250+ Global Internships at Canada, Taiwan, Russia, UK & More...




**ADMISSIONS OPEN 2026-27**

Kopargaon (Near Shirdi), Dist. Ahilyanagar, Maharashtra - 423 601
98348 69997 | 91 301 91 301
www.sanjivani.edu.in